स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 05—10—2012 रोजी दुपारी 12—00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 12. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 13. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 14. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 15. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 16. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंत कुमार पवार, अति. निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 132** :– वाहतुक पोलीस दक्षिण शाखा अंतर्गत – व्हेरायटी चौक ते लोखंडी पूल पर्यंत (सिताबर्डी मार्केट रोड) येथील

1) व्हेरायटी चौक–बॉम्बे शॉप ते बैद्यनाथ शॉप
   - i) डावे बाजू दोन चाकी वाहन करीता (लांबी 361 मीटर)
   - ii) उजवे बाजु दोन चाकी वाहन करीता (लांबी 381 मीटर)

2) बैद्यनाथ शॉप ते भारत वॉच शॉप (लोखंडी पूल)
   एक दिवसाच्या आड दोन चाकी वाहन करीता एकतर्फी पार्कींग
   Alternate day one side 2 Wheelers Parking (लांबी 222 मीटर)

करिता '' पे ॲन्ड पार्क '' योजना राबविण्याकरिता प्राप्त "मे. द स्पून कॅफे ॲण्ड गार्डन रेस्टॉरेन्ट" (प्रो. श्री. मिलींद माणिकराव साबळे) यांची रुपये 13,03,282/– प्रति वर्ष ची एकमेव ई– निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयावर मा. आयुक्त म.न.पा. व मा. पोलीस आयुक्त यांनी योग्य निर्णय सात दिवसात घेऊन निर्णयास्तव परत स्थायी समितीकडे विषय पाठवावा यास्तव विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 133** :– नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही बाजारात विक्रीकरीता माल मांडणाऱ्या व्यक्ती कडुन, बाजारपट्टी वसुल करण्यासाठी म.न.पा. अधिनियम 1948 कलम 114 (च) अन्वये तरतुद आहे. नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागा अंतर्गत येणाऱ्या 10 अधिकृत बाजारा मधुन, यापुर्वी रू. 2/– दराने बाजारपट्टी सन 2009 –10 पर्यंत वसुल करण्यात येत होती.

हॉकर्स नोंदणी सुरू करण्यात आल्यामुळे अधिकृत आठवडी व दैनिक बाजारातील बाजारपट्टी वसुली बंद करण्यात आली आहे. तसेच हॉकर्स नोंदणीचे काम बंद केलेले आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेवुन शहराच्या विविध भागातील म.न.पा.च्या एकुण 10 अधिकृत बाजारात व्यवसाय करणाऱ्यांकडुन पुन्हा दैनिक व आठवडी बाजारपट्टी रू. 2/– ऐवजी रू. 10/– प्रमाणे घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त वसुली ही, **"वापर शुल्क"** म्हणून घेण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 134** :– नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत भरत असलेल्या अनधिकृत आठवडी व दैनिक बाजारात येणाऱ्या भाजीपाला/वस्तु विक्रेत्याकडुन म.न.पा. सेवा शुल्क रू. 10/– या दराने बाजार चिठ्ठी वसुल करण्यास्तव, मंजुरी प्रदान करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या दहा (10) अधिकृत आठवडी बाजारा व्यतीरीक्त शहरात तेवीस (23) अनधिकृत आठवडी बाजार व एकविस (21) दैनंदीन बाजार क्षेत्र आहे. बाजार संपल्या नंतर त्या परीसरातील म.न.पा.च्या असलेल्या सोयीसुविधा पुर्वरत देखभाल करणे व संपुर्ण बाजार परीसरातील साफसफाई करणे यासाठी म.न.पा.ला मनुष्यबळ नियीमत पणे बाजार परीसरात लावावा लागतो. परंतु या प्रक्रिये पासुन म.न.पा.ला कोणत्याही प्रकारचे उत्पन्न प्राप्त होत नाही.

अशा अनधिकृत क्षेत्रात दैनिक बाजार शुल्क/आठवडी बाजार शुल्क म्हणून वसुल करण्यावर निर्बंध आहे. तरी या क्षेत्रात प्रशासकिय / व्यवसाय /सेवा शुल्क म्हणून रू. 10/– प्रमाणे घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त वसुली ही, **"वापर शुल्क"** म्हणून घेण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 135** :– प्रभाग क्र.53, येथील नविन फुटाळा वस्तीच्या टेकडीला दुर्गा माता मंदिर ते श्री. ताराचंद गेडाम याचे घरापर्यंत संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव रु. 49,96,480/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा तसेच या कामास्तव आर्कीटेक्ट एन वास्तु. (इम्पॅनल्ड आर्कीटेक्ट ), यांची 1.60 टक्के दरावर पी.एम.सी. म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 136** :– नागपूर महानगरपालिका, अग्निशामक विभागातर्फे म.न.पा विशेष सभा ठराव क्र.355, दि. 10.02.2009 नुसार चिल्लर फटाका व्यवसाय करीता अग्निशमन विभागाचे सुचनापत्र निर्गमीत करण्याकरीता रु. 2000/– शुल्क आकारण्यात येत होते. मा. आयुक्त म.न.पा. यांचे दि.12.09.2011 च्या मंजुरी आदेशान्वये चिल्लर फटाका व्यवसाय करीता रु.2000/– च्या ऐवजी 15 दिवसाकरिता लावण्यात येणाऱ्या फटाका व्यवसाया करीता रु. 1000/– शुल्क आकारण्यास मंजुरी प्रदान केलेली असल्याने सभे तर्फे एकमताने प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 137** :– भांडेवाडी येथील मलःनिस्सारण तथा हिवरीनगर स्थित पंपीग स्टेशन चे देखभालीचा कंत्राट सप्टेंबर 2012 ला संपत असून, नव्याने निवीदा काढण्याची कार्यवाही पार पडण्यास अंदाजे 2 ते 3 महिण्याचा कालावधी लागणार असल्यामुळे सद्यः कार्यरत मे. अश्वमेघ इंजीनिअर व कन्सलटंट को– ऑप. सो. लि. नाशिक यांना जुन्याच दरावर दि. 30.11.2012 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

मुदतीनंतर पुढील 05 (पांच) वर्षाकरिता नव्याने निवीदा काढणे गरजेचे असल्यामुळे रु. 3,89,37,600 चे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 138** :– प्रभाग क्र.40 ब गांधीबाग येथील भावसार भवन ते हारमोनी हॉटेल पर्यत (सी.ए.रोडच्या मागील रस्ता ) सिमेंट रोडचे बांधकामास्तव रु.44,65,695/– रकमेच्या कामास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 139** :– गांधीबाग झोन क्र.6 चे कार्यालय सोख्ताभवन या ठिकाणी होते. सध्या 6 वर्षापासून झोन कार्यालय महाल येथे स्थानांतरित झाले असून नावात बदल न झाल्यामुळे संभ्रम टाळण्याकरिता गांधीबाग झोन क्र.6 चे नांव बदलून महाल झोन क्र.6 असे करण्यात यावे.

उपरोक्त प्रस्ताव समितीने विचारात घेऊन प्रस्तावित प्रस्तावात खालील प्रमाणे बदलास एकमताने मंजूरी प्रदान करुन म.न.पा. सभागृहास पाठविण्याची शिफारस करण्यांत येते असा एकमताने निर्णय घेतला.

1. महाल झोन क्र. 6 ऐवजी, **"गांधी झोन महाल"** तसेच कार्यालयाने दिलेल्या सुचनेनुसार
2. मंगळवारी झोन क्र. 10 ऐवजी, **"सदर झोन"**

**<u>ठराव क्रमांक 140</u> :–** मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी सभेमध्ये वाचून दाखविला व समितीने यास एकमताने मंजूरी प्रदान करुन उपरोक्त ठराव म.न.पा. सभागृहास पाठविण्याची शिफारस करण्यांत येते असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

– <u>ठराव</u> –

म.न.पा. अधिनियमाच्या व त्या खालील कोणत्याही प्रयोजनाकरिता जे प्रयोजन आयुक्तांना महानगरपालिकेच्या किंवा दुसऱ्या एखादया महानगरपालिका प्राधिकाऱ्याच्या मान्यतेवाचून किंवा मंजूरी वाचून पार पाडता येणार नाही. अश्या कोणत्याही प्रशासकीय मान्यता, निविदा/संविदा ही प्रथम आयुक्त किंवा आयुक्तांनी ज्यांना अधिकार दिले आहे. अशा सक्षम प्राधिकाऱ्याच्या रितसर अनुमती किंवा मंजूरी/शिफारसी मिळाल्यावाचून स्थायी समिती कडे मंजूरी करिता येत नाही.

आयुक्त किंवा सक्षम प्राधिकारी त्यांच्या मंजूरी व शिफारशी शिवाय स्थायी समिती प्रस्तावित विषय स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर घेत नाही. आयुक्त ज्या विषयांची शिफारस मंजूरी करिता स्थायी समितीकडे करतात असे विषय स्थायी समिती निकालात काढत असते व अशा सर्व स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची आयुक्त अंमलबजावणी करीत असते.

परंतू स्थायी समितीच्या असे निदर्शनास आले की, स्थायी समितीने निकालात काढलेले अनेक विषय दोन ते तिन महिण्यांत त्यांची अंमलबजावणी झालेली नाही.

स्थायी समितीच्या सर्व सदस्यांचा मानस लक्षांत घेत ज्या प्रमाणे शासनाने महानगरपालिकेच्या अधिनियमातील कलम 38 (1) अ मधे सुधारणा करुन प्रशासनाने पाठविलेल्या प्रस्तावावर बंधन घातलेले आहे. त्याच आधारावर प्रशासनानी पाठविलेल्या प्रस्तावावर स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची किंवा निकालात काढलेल्या प्रस्तावांची अंमल बजावणी आयुक्तांनी 15 दिवसाच्या आंत केली पाहीजे जर आयुक्तांनी असे करण्यास कसूर केल्यास स्थायी समितीने घेतलेला निर्णय आयुक्तांकडून पूर्व मान्यता देण्यांत आली आहे. असे मानण्यात येईल. अशी म.न.पा. च्या अधिनियमात सुधारणा करण्यास स्थायी समितीची ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करुन म.न.पा. सभागृहास अधिनियमातील या बदलाची शिफारस शासनाकडे करावी यास मंजूरी प्रदान करते.

सुचक /– हस्ता/– प्रफुल्ल गुडधे
अनुमोदक/– हस्ता/–सतिश होले
हस्ता/–परिणय फुके

++ ++ +++

**<u>ठराव क्रमांक 141</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता/– हरीष दुबे
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता/– दयाशंखर तिवारी
अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर